**RTS App developed by ABM Knowledgeware for Solapur Corporation is now available for this Municipal Corporation to make its optimum use.-**

**(Divyacity news, 3-10-17)**






# जन्म-मृत्यू, विवाह नोंदणीसह १५ सेवा ऑनलाइन सुरू

प्रतिनिधी । सोलापूर

महाराष्ट्र सेवा हमी कायदा २०१५ अंतर्गत महापालिकेतर्फे नागरिकांना १५ सेवा ऑनलाइन उपलब्ध केल्या आहेत. त्याचे उद्‌घाटन पालकमंत्री विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले.

महापालिकेच्या संकेतस्थळा (www.solapurcorporation.org) वरून या सेवेचा लाभ घेता येणार आहे. स्वयंसेवक, स्वयंसेवी संस्थांना नोंदणी करता येईल.

**या सेवा (कंसात कलावधी) :** जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, मालमत्ता कर उतारा, मालमत्ता कर थकबाकी नसल्याचा दाखला, भाग नकाशा (३ दिवस), दस्तऐवजाद्वारे मालमत्ता हस्तांतरण नोंदणी प्रमाणपत्र, वारसहक्काचे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र, जोते प्रमाणपत्र, नळ जोडणी, ड्रेनेज जोडणी देणे (१५ दिवस), बांधकाम परवाना देणे (६० दिवस), भोगवाट प्रमाणपत्र (३० दिवस), झोन दाखला व अग्निशामक ना हरकत दाखला (७ दिवस).

## कसे भराल पैसे ?

**डेबीट कार्ड, व्हिसा कार्ड, नेटबँकिंगने शुल्क भरता येईल. संकेतस्थळावर नोंदणी करण्यासाठी पत्ता, मोबाइल नंबर, ई-मेल आयडी यांची माहिती द्यावी लागेल.**

**दिव्य मराठी (पान नं १)**
**दिनांक ०३ ऑक्टोबर २०१७**